| MHKO070000862023 | **<u>म.सं.कौं.हिं.का. अर्ज ५/२०२३</u>**<br>स्नेहल अमित मगदुम आणि इतर<br>वि.<br>अमित सुकूमार मगदुम आणि इतर |
|---|---|

<u>नि.क्र.८६ खालील आदेश</u>

अर्ज वाचला. त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. लेखी युक्तीवाद देखील दाखल करण्यात आलेला आहे. त्याचेही अवलोकन करण्यात आले.

०२. जाबदाराने सदरचा अर्ज हा त्यांची मुलगी अन्वी व अधिरा यांचा तात्पुरता ताबा दि.११/०१/२०२६ रोजी सकाळी ०८.०० ते रात्री ०८.०० या कालावधीसाठी त्यांचेकडे मिळणेसाठी दाखल केलेला आहे. जाबदाराने सदरचा अर्ज हा महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदा, २००५ चे कलम २१ प्रमाणे दाखल केलेला आहे. त्यामुळे त्याचे अवलोकन होणे गरजेचे आहे. त्यानुसार

> ***21. Custody orders.*** *—Notwithstanding anything contained in any other law for the time being in force, the Magistrate may, at any stage of hearing of the application for protection order or for any other relief under this Act grant temporary custody of any child or children <u>to the aggrieved person or the person making an application on her behalf</u> and specify, if necessary, the arrangements for visit of such child or children by the respondent :*
>
> *Provided that if the Magistrate is of the opinion that any visit of the respondent may be harmful to the interests of the child or children, the Magistrate shall refuse to allow such visit.*

०३. सदर अर्जाचे अवलोकन केले असता जाबदार यांनी भेटण्याची परवानगी न मागता मुलांचा ताबा मागीतलेला आहे. अर्जदार व जाबदार यांनी नि.क्र.६६ ला पुरसिस दाखल केलेली आहे. त्या पुरसिसमध्ये सदर मुलांच्या ताब्याबाबत सविस्तर नमुद केल्याचे दिसुन येत नाही. अर्जदार व जाबदार यांचे राहण्याचे ठिकाण पाहता व अर्जातील कलम नं.5c मधील मजकुर पाहता तो एकरुप असल्याचे दिसुन येत नाही. तसेच सदर कलमाअंतर्गत या क्षणी जाबदार यांना वर नमुद कलमानुसार ताबा मागता येणार नसल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदाराच्या कथनानुसार वि.प.क्र.१ यांनी त्यांच्याविरुध्द हिंदू विवाह कायदयाखाली घटस्फोटाची देखील मागणी केलेली आहे. त्यासोबतच अर्जदाराने प्रस्तुत अर्जामध्ये भेटण्याची मागणी केली नसुन ताब्याची मागणी केल्यामुळे ती मंजुर करता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर होणेस पात्र नाही. करीता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.८६ हा नामंजूर करणेत येतो.

२. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.01.08 17:47:21 +0530

जयसिंगपूर

दिनांक–०८/०१/२०२६

**(अ. त्रिं. मनगिरे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 08/01/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 08/01/2026. |
| Judgment/order uploaded on | 08/01/2026. |